# जाहिरात नमुना सन २०२१-२२
# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे परिमंडळ, पुणे.

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

पुणे परिमंडळांतर्गत **पुणे महानगरपालिका** करीता रिक्त पदांची भरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज **http://ddhspune.com/** या लिंकवरती मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पुर्णवेळ) (Medical Officer) | ०९ | MBBS MCI/MMC कौन्सिल कडील नोंदणी आनिवार्य | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग (सेवा निवृत्त शासकिय अधिकारी असल्यास वयोमर्यादा कमाल ७० वर्षापर्यंत राहील यासाठी वैद्यकिय दृष्टया फिट असल्याचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य) | रु.६०,०००/- | अ.जा. १<br>वि.जा.(अ) १<br>भ.ज.ब. १<br>भ.ज.क. १<br>इ.मा.व.२<br>ई.डब्ल्यु.एस.२<br>खुला १ |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | ३६ | 12th + Diploma in Medical Laboratory Technology (महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाचा डिप्लोमा कोर्स) शैक्षणिक अर्हता अनिवार्य | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | रु.१७,०००/- | अ.जा.५<br>अ.ज.३<br>वि.जा.अ.१<br>भ.ज.ब.१<br>भ.ज.क.१<br>भ.ज.ड.१<br>वि.मा.प्र.१<br>इ.मा.व.८<br>ई.डब्ल्यु.एस.५<br>खुला १० |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि.१०/११/२०२१ ते २५/११/२०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र (वरील तक्त्याप्रमाणे) ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) ५) शासकीय / निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र यामध्ये National Health Mission मध्ये काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. ६) निवासी पुरावा ७) जातीचे प्रमाणपत्र ८) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत **जोडलेल्या ऑनलाईन लिंक http://ddhspune.com/ वर जाऊन अर्ज सादर करावा.**

२) अर्जासोबत उमेदवारांनी परिक्षा शुल्क रक्कम रु.३००/- रुपयांचा डिमांड ड्राफट Deputy Director Health Services Pune यांच्या नावे पोस्टाने, कुरियरने अथवा व्यक्तिशः मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, एनएचएम विभाग, कौन्सिल हॉल समोर, पुणे १ येथे विहित मुदतीत सादर करावा. (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून इतर दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) तसेच अर्ज ऑनलाईन भरताना डिमांड ड्राफटचा फोटो, बॅकेचे नाव व डिमांड ड्राफटच्या मागच्या बाजूला पदाचे नाव, अर्ज क्रमांक, उमेदवाराचे संपुर्ण नाव, मोबाईल नंबर अचूक लिहावे.

३) सदरचे पदे ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत.

४) जर या आधी उमेदवाराने राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असेल तर वयोमर्यादेमध्ये ५ वर्षे शिथिल करण्यात येतील.

५) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

६) ऑनलाईनद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण उच्च शैक्षणिक अर्हता व शासकीय /

निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील, जर लॅब टेक्निशियन पदासाठी उमेदवार जादा आल्यास त्यांची मुलाखत घेतली जाईल हा निर्णय सर्वस्वी निवड समितीचा राहील.

७) वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस या पदाकरिता उमेदवार दिलेल्या जाहिरातीपेक्षा कमी आले तर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी थेट मुलाखती घेवुन जागा भरण्यात येतील.

८) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

९) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरिता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये नमुद करावा.

१०) उपरोक्त पदांकरिता असलेल्या सर्व सूचना १) तात्पुरते पात्र/अपात्र यादी २) हरकती स्विकारणे ३) अंतिम पात्र/अपात्र यादी हया बाबी राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई कडील संकेतस्थळावर nrhm.maharashtra.gov.in व **http://ddhspune.com/** वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. तसेच उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे कार्यालयातील नोटीस बोर्डवर वेळोवेळी दाखविण्यात येईल. तथापि, याबाबत उमेदवारास कोणतीही वेगळी सूचना अथवा दूरध्वनी, एसएमएस, ई -मेल केला जाणार नाही यांची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी दोन्ही संकेतस्थळास/कार्यालयास भेट देणे अनिवार्य राहिल.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१२) पदभरतीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवु नये. तसेच उपसंचालक कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच पात्र उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे मेरिट लिस्ट लावण्यात येईल उमेदवार संख्या जादा आल्यास मुलाखती घेण्यात येतील याचे सर्वस्वी अधिकार निवड समितीस राहतील.

१३) अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१४) भरतीप्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल.

१५) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इ.सर्व अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

09/11

**(स्वाक्षरीत /-)**
**उपसंचालक, आरोग्य सेवा,**
**पुणे परिमंडळ, पुणे**